## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २८७०/२०१९

**अपिलार्थी, श्री.रणजीत पांडुरंग घरत.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
तहसिल कार्यालय वसई, किल्ला रोड,
ता.वसई, जि.पालघर.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय वसई, किल्ला रोड,
ता.वसई, जि.पालघर.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०३.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०२.२०१९ | -- | २५.०६.२०१९ | -- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१६.०९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०३.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.प्रदिप दामोदर मुकणे तथा नायब तहसिलदार महसुल, तहसिल कार्यालय, वसई उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राहुल परशुराम राठोड तथा अव्वल कारकून महसुल, तहसिल कार्यालय, वसई उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केले की, त्यांच्या दिनांक ०४.०२.२०१९ च्या अर्जान्वये *"तहसिल कार्यालयत दाखल केलेल्या दि.११.०६.२०१८ ची प्रत व त्याबाबत आवक रजिस्टरची सत्यप्रत तसेच इतर माहिती मिळणेबाबत."* अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती दिलेली नाही. यास्तव दि.२५.०६.२०१९ रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, आदेश पारित केले नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपिलार्थीनी दि.०४.०२.२०१९ रोजी दाखल केलेला माहिती अर्ज कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर संबंधित लिपिकाने सदर अर्ज त्यांच्या निदर्शनास न आणून दिल्यामुळे, माहिती देण्यास विलंब झाला आहे. संबंधीत लिपिक यांना कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधित लिपिक यांच्या विरुध्द झालेल्या कारवाईचा अहवाल आयोगाकडे सादर करणे योग्य होईल. तसेच अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. याप्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांची उपस्थित अनिवार्य राहिल.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. संबंधीत लिपिक यांच्या विरुध्द झालेल्या कारवाईचा अहवाल आयोगाकडे १५ दिवसात सादर करावा.
३. **सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२.०४.२०२२ रोजी दुपारी १२.४० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

(सुनील पोरवाल)

राज्य माहिती आयुक्त,

कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० मार्च, २०२२ .

सुनावणी दिनांक २२.४.२०२२ (In continuation of order dt.१०.३.२०२२)

विवेचन

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.१६.९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.४.२०२२ रोजी पुनर्सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीच्या वेळीस अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांच्या दि.४.२.२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. परंतु त्यांनी दि.२५.६.२०१९ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि, सुनावणीच्या वेळी उपस्थित प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनीही असे सादर केले की, अपिलार्थी यांचा सदरचा प्रथम अपिल अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. तसेच त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिक यांनीही सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली नाही. त्याचप्रमाणे इतर काही प्रकरणांमध्येही असे घडलेले असून संबंधित लिपिकाविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

सुनावणी वेळेचा युक्तिवाद व उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, सदर प्रकरणी अपिलार्थीस उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. पंरतु, प्रथम अपिल अर्ज प्रकरणी निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे. या कारणास्तव प्रस्तुत प्रकरणी पुनःश्च सुनावणी घेण्यात येईल व त्यावेळी संबंधित लिपिकाविरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाही संबंधीचा अहवाल आयोगासमोर सादर करणे उचित होईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

३. अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.९ जून, २०२२ रोजी दुपारी १२: ५० वाजता घेण्यात येईल व त्यावेळी संबंधित लिपिकाविरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाही संबंधीचा अहवाल आयोगास सादर करावा.**

सही/-

(सुनील पोरवाल)

राज्य माहिती आयुक्त,

कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ एप्रिल, २०२२

## अपिल क्रमांक : के.आर- २८७०/२०१९

## अपिलार्थी, श्री.रणजीत पांडुरंग घरत.

## सुनावणी दिनांक ०९.०६.२०२२ ( In Continuation of order dt.२२.०४.२०२२)

## विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

संगणक-११

आजच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय, वसई यांनी असे सादर केले की, दि.२४.१२.२०२१ रोजी संबंधित लिपिक यांचे विरुध्द कारवाईसाठी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तद्नंतर पुन्हा दि.०१.०६.२०२२ रोजी पत्र पाठविले आहे. तथापि आतापर्यंत कोणती कारवाई झाली याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.

निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी या विषयावर संबंधीत लिपिकावर केलेल्या कारवाईचा अहवाल ३० दिवसात आयोगासमोर सादर करणे योग्य होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०८.०७.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०९ जून, २०२२ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर,
ता.जि.पालघर.